**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं  निधन/ सर्वत्र शोककळा पसरली

- महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची, वेळ आली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- या विषयावर येत्या २९ एप्रिलनंतर सर्वपक्षीय बैठक बोलवावी अशी काँग्रेसची मागणी

- अमरनाथ यात्रा यंदा येत्या ३ जुलैपासून

**आणि**

- देशात विविध ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातात १८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं आज मुंबईत  निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली. आशा भोसले यांच्या  निधन वार्तेनं सर्वत्र शोककळा पसरली आहे. गेली ८ दशकं पिढी दर पिढी रसिकांना त्यांचा आवाज जवळचा आणि आपलासा वाटत राहिला.

१९४३ मधे माझा बाळ या चित्रपटाकरता त्यांचं पहिलं गाणं ध्वनिमुद्रित झालं, त्यानंतर भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांपासून नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, गझल, लोकसंगीत, रवींद्र संगीत एवढंच नाही तर पाश्चात्य पॉप संगीतातही त्यांच्या बहु आयामी आवाजाने वेगळं स्थान निर्माण केलं होतं. देशोदेशीच्या श्रोत्यांना त्यांच्या गायनाने भुरळ घातली होती.

पद्मविभूषण सन्मान आणि दादासाहेब फाळके पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना मिळाले होते. ग्रॅमी पुरस्कारासाठी देखील त्यांना दोन वेळा नामांकन मिळालं होतं. १२ हजार गाणी ध्वनिमुद्रित करण्याच्या त्यांच्या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने घेतली होती.

गायनाच्या जाहीर कार्यक्रमांमधे त्यांच्यातल्या अष्टपैलू कलाकाराचं दर्शन घडत असे. २०१३ मधे आलेल्या माई या चित्रपटात त्यांनी मध्यवर्ती भूमिका केली होती.

आशा भोसले यांच्या पार्थिवावर उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

आशा ताईंनी अखेरच्या श्वासापर्यंत आपलं जीवन संगीत क्षेत्राला वाहून घेतलं होतं. आज आपण अशा गायिकेला मुकलोय जिने भारताचं नाव जगभरात प्रसिद्ध केलं. आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली, अशा शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शोक व्यक्त केला आहे.

सुमधुर स्वर आणि अतुलनीय गायनाचा मूर्तिमंत आविष्कार असलेल्या आशा भोसले यांनी, गेल्या अनेक दशकांमध्ये भारतीय संगीताला यशाच्या नव्या शिखरांवर नेऊन ठेवलं. त्यांच्या निधनाने लक्षावधी चाहत्यांची कधीही भरून न येणारी हानी झाल्याची भावना केंद्रीय पीयूष गोयल यांनी व्यक्त केली आहे.

आशाताई आणि मंगेशकर कुटुंबाने संगीताची अविरत सेवा केली. लतादीदींच्या रुपात संगीतातला पहिला तारा निखळताना आपण पाहिला आणि आता आशाताईंच्या निधनाने संगीतातला दुसरा ताराही निखळल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

आशा भोसले यांनी भाषेची बंधनं तोडून २० पेक्षा जास्त भाषेत पार्श्वगायन केलं होतं. त्यांच्या निधनाने साक्षात सरस्वतीच्या वीणेची झंकार शांत झाल्याची शोकभावना राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची, तसंच २०२९ ला होणार असलेल्या लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका महिला आरक्षणाच्या तरतुदीसह पार पडतील याची सुनिश्चिती करण्याची वेळ आली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी लोकसभा आणि राज्यसभेतल्या विविध पक्षांच्या गटनेत्यांना पत्र लिहीलं आहे. सर्व सदस्यांनी, महिला आरक्षण कायद्यातल्या सुधारणेसाठीचं, नारी शक्ती वंदन अधिनियम एकमतानं संमत करण्यासाठी एकत्र यावं असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी या पत्रातून केलं आहे.

येत्या १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी हे पत्र लिहीलं आहे. येत्या काळात लोकसभेच्या जागा ८१६ पर्यंत

वाढणार आहेत, अशावेळी हे विधेयक संमत झाल्यानंतर त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत.

<><><><>

या विषयावर १६ ते १८ एप्रिल दरम्यान होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनात उपस्थित राहण्याचा पक्षादेश भारतीय जनता पार्टीनं आपल्या सर्व खासदारांसाठी काढला आहे.

<><><><>

मतदारसंघांची पुनर्रचना आणि  इतर संबंधित तपशिलांशिवाय महिला आरक्षण कायद्यावर कोणतीही उपयुक्त चर्चा करणं शक्य नसल्याचं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात खर्गे यांनी प्रधानमंत्र्यांना पत्र लिहीलं आहे. येत्या २९ एप्रिल रोजी विविध राज्यांमध्ये सुरु असलेल्या विधानसभा निवडणुकांचे सर्व टप्पे पूर्ण झाल्यावर, या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी अशी मागणीही खर्गे यांनी या पत्रातून केली आहे.

इतर राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका सुरु असतानाच संसदेचं विशेष अधिवेशन बोलवून, केंद्र सरकार राजकीय लाभासाठी महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्याची घाई करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

नारी शक्ती वंदन अधिनियमावर चर्चेसाठी येत्या १६ एप्रिलपासून संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याबाबत प्रधानमंत्र्यांनी पाठवलेल्या पत्राला उत्तर म्हणून खर्गे यांनी प्रधानमंत्र्यांना हे पत्र लिहिलं आहे.

<><><><>

वार्षिक अमरनाथ यात्रा यंदा 3 जुलै ते 28 ऑगस्ट दरम्यान असेल अशी घोषणा जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी समाज मध्यमावरच्या पोस्ट मध्ये केली आहे. ज्येष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने 29 जून रोजी भगवान शिवाची प्रथम पूजा होईल. या यात्रेसाठी आगाऊ नोंदणी 15 एप्रिल पासून ऑनलाइन आणि ऑफलाईन पद्धतीनं सुरू होईल. देशभरातल्या जम्मू आणि काश्मीर बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि येस बँक या बँकांच्या एकूण ५५४ शाखांमध्ये नोंदणीची सुविधा उपलब्ध असेल.

<><><><>

एप्रिल महिन्याच्या पहिल्या दहा दिवसात परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात आक्रमक विक्री सुरु ठेवत सुमारे ४८ हजार २१३ कोटी रुपये काढून घेतले. वाढते भू राजकीय तणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे गुंतवणूकदारांनी हे पाऊल उचलल्याचं बाजार विश्लेषकांचं मत आहे. ताज्या आकडेवारीनुसार, २०२६ मध्ये आतापर्यंत परकीय गुंतवणूकदारांनी १ लाख ८० हजार कोटी  रुपये काढून घेतले आहेत.

मार्च महिन्यात गुंतवणूकदारांनी सुमारे १ लाख १७ हजार कोटी रुपये भारतीय बाजारातून काढून घेतले, जी आजवरची एका महिन्यात काढून घेतलेली सर्वाधिक गुंतवणूक आहे.

त्या आधी फेब्रुवारी महिन्यात परकीय गुंतवणूकदारांनी भारतात सुमारे २२ हजार ६१५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती, जी मागच्या १७ महिन्यातली सर्वाधिक मासिक गुंतवणूक होती.

**<><><><><>**

भारताचा ध्वज असलेलं जग विक्रम या एलपीजी इंधन वाहू जहाजानं काल होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली. या जहाजातून अंदाजे २० हजार टन एलपीजी आणला जात असल्याचं वृत्त आहे. अमेरिका आणि इराण दरम्यान दोन आठवड्यांचा तात्पुरता युद्धविराम जाहीर झाल्यानंतर, होर्मुझ मधून निघणारं हे पहिलं भारतीय जहाज आहे.  अजूनही १५ भारतीय जहाजं या भागात अडकली आहेत.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिका हा भारतासाठी महत्त्वाचा भागीदार देश आहे असं अमेरिकेतले भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी म्हटलं आहे. कोलंबिया विद्यापीठात आयोजित आर्थिक शिखर परिषदेला क्वात्रा यांनी संबोधित केलं त्यावेळी ते बोलत होते. भारताचा आर्थिक विकास हा आंतरराष्ट्रीय भागीदारांसाठी मोठी संधी असल्याचंही त्यांनी सांगितलं. २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प साकार करण्याच्या वाटचालीत, भारत आपल्या नागरिकांची आर्थिक प्रगती आणि समृद्धीचंही उद्दिष्ट गाठेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारताचा विकास हा प्रामुख्याने देशांतर्गत प्रयत्नांच्या आधारे होत असला, तरही सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर घडत असलेल्या बदलांबाबतही भारतानं सजग राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोन्ही नेते परस्पर द्विपक्षीय संबंधांना गती देण्यावर भर देत असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट मध्ये आज दुपारी साडेतीन वाजता लखनौच्या एकाना क्रिकेट मैदानावर लखनौ सुपर जाएन्टस आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरू होईल. दुसऱ्या एका सामन्यात मुंबई इंडियन्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बांगरुळू यांच्याशी वानखेडे मैदानावर संध्याकाळी साडेसात ला सुरू होईल.

<><><><><>

देशात विविध ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले.

बिहारमधल्या कटिहार जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात १३ जण जागीच मरण पावले तर अनेक जण जखमी झाले. प्रवासी वाहतूक करणारी बस आणि एका पिकअप व्हॅनची समोरासमोर टक्कर झाल्यानं हा अपघात घडला. मृतांमध्ये एका दुचाकीस्वाराचा देखील समावेश आहे.

मध्य प्रदेशातल्या दिंडोरी जिल्ह्यात मध्यरात्री एक ट्रक आणि पिकअप व्हॅन यांची धडक होऊन झालेल्या अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू झाला तर १ जण जखमी झाला. हे सर्वजण पिकअप व्हॅनमधून घरी परतत असताना ही दुर्घटना घडली.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात येत्या गुरुवारपासून पुन्हा पश्चिमेकडच्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे वादळी पाऊस आणि हिमवृष्टीची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशात उंचावरच्या भागात हिमवृष्टी सुरु असून सखल भागात काल वादळी पाऊस झाला. सरासरी ३ सेंटीमीटर जाड बर्फाचा थर बसला आहे. काही ठिकाणी वीज कोसळली. आज डोंगराळ भागात पुन्हा हिमवृष्टीची शक्यता असून सखल भागात हवामान स्वच्छ राहील. देशाच्या इतर भागात मात्र तापमानात वाढ होत आहे.

<><><><><>

भारतीय नौदलानं आयोजित केलेल्या पहिल्या नौदल अधिकारी परिषदेचा प्रारंभ येत्या मंगळवारी नवी दिल्लीत होणार आहे. ही ३ दिवसीय परिषद, देशाच्या सागरी हितसंबंधाच्या

रक्षणासाठी नौदलाची तयारी, क्षमता विकास आणि राष्ट्रीय सुरक्षा उद्दिष्टांशी धोरणात्मक समन्वय यांचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

**//<><><><><>//**